# —: प्रेस नोट :—

## मंडळ अधिकारी कार्यालय खमनचेरू, तलाठी महागाव साजा क्र.१० येथील मंडळ अधिकारी व तलाठी यांचेवर ॲन्टी करप्शन ब्युरोची कारवाई

तलाठी साजा क्र१० महागांव येथील तलाठी श्री. व्यंकटेश सांबय्या जल्लेवार वय ४० वर्ष वर्ग-३ व मंडळ अधिकारी कार्यालय खमनचेरू येथील मंडळ अधिकारी श्री. भुषण रामभाउ जवंजाळकर वय ३८ वर्ष, वर्ग-३ यांना ९०००/- रुपये लाच रक्कमेची पंच साक्षीदारा समक्ष सुस्पष्ट मागणी करून तडजोडीअंती ६०००/-रू लाच स्विकारतांना मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्या करीता ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोलीच्या पथकाने आज आज रोजी ताब्यात घेतले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, तक्रारदार यांस दि. २/८/२०२४ रोजी लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे श्री. व्यंकटेश सांबय्या जल्लेवार वय ४० वर्ष वर्ग-३ तलाठी साजा क्र १० महागाव यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून स्वतःचे आर्थिक फायद्या करीता वाम व भ्रष्ट मार्गाने तक्रारदारास तिन हिस्सेदारांचे शेतजमीन फेरफार करून सात-बारावर नाव चढविण्या करीता प्रत्येकी ३०००/-रू प्रमाणे एकुण ९०००/-रू लाच रक्कमेची पंच साक्षीदारा समक्ष सुस्पष्ट मागणी केली. तक्रारदार यांना आरोपीस लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील अधिकाऱ्यांना भेटुन तक्रार नोंदविली.

पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले, ला.प्र.वि. गडचिरोली व लाप्रवि. टिम नी तक्रारदाराने दिलेल्या तक्रारीची अत्यंत गोपनीयरित्या शहानिशा करून सापळा कारवाईचे आयोजन केले असता, त्यामध्ये पडताळणी दरम्यान तक्रारदार यांस तिन हिस्सेदारांचे शेतजमीन फेरफार करून सात-बारावर नाव चढविण्या करीता प्रत्येकी ३०००/-रू प्रमाणे एकुण ९०००/-रू लाच रक्कमेची पंच साक्षीदारा समक्ष सुस्पष्ट मागणी करून तडजोडीअंती ६०००/-रू लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात मिळुन आल्याने त्यांचे विरूध्द पोस्टे. अहेरी जिल्हा-गडचिरोली येथे गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी श्री. व्यंकटेश सांबय्या जल्लेवार, तलाठी वय-४० वर्ष, तलाठी साजा क्र.१० महागांव व श्री. भुषण रामभाउ जवंजाळकर वय ३८ वर्ष, मंडळ अधिकारी खमनचेरू, ता. अहेरी जि. गडचिरोली यांचे घराची घर झडती घेण्यात आली.

सदरची कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री.राहुल माकणीकर, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर, श्री. सचिन कदम अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपूर, मा. श्री. संजय पुरंदरे अपर पोलीस अधिक्षक, ला.प्र.वि. नागपुर यांचे मार्गदर्शनात व पोलीस उपअधिक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले, पो.नि. शिवाजी राठोड, सफौ-सुनिल पेद्दीवार, पोहवा-शंकर डांगे, पोहवा-किशोर जौंजारकर, पो.अं.-प्रविण जुमनाके, सर्व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली यांनी केलेली आहे.

गडचिरोली जिल्हयातील सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, त्यांच्याकडे कोणत्याही शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसम (एजेंट) कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास तात्काळ ॲन्टी करप्शन ब्युरो, गडचिरोली यांचेशी सपंर्क साधावे असे आवाहन पोलीस उप-अधीक्षक श्री. चंद्रशेखर पी. ढोले यांनी केले आहे.

**पोलीस उप-अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालय, गडचिरोली**
**दुरध्वनी क्रमांक - ०७१२-२९५०२०**
**टोल फि क्रमांक - १०६४**

AnyScanner